**आदेश:**

जा.क्र. शिक्षण/कावि/ २५४ /२०२०
पुणे. दिनांक :- १३/०३/२०२०

**महत्वाचे:**

**प्रति ,**

**सर्व मुख्याध्यापक/प्राचार्य**
पुणे व पिंपरी चिंचवड शहर.

**विषय** :- सर्व व्यवस्थापनाच्या सर्व माध्यमाच्या शाळा,महाविद्यालयास सुट्टी देणेबाबत.

**संदर्भ** :- मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांनी दिनांक.१३/०३/२०२० रोजीच्या बैठकीत दिलेले निर्देश.

उपरोक्त विषयान्वये पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमाच्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालय यांना कळविणेत येते की, कोरोना विषाणुचा संसर्ग रोखण्यासाठी पुणे शहर व पिंपरी चिंचवड शहरातील सर्व व्यवस्थापनाच्या व सर्व माध्यमाच्या शाळा, महाविद्यालये आणि त्यांची कार्यालये पुढील आदेश होईपर्यंत बंद ठेवण्यात यावीत.

या कालावधीत विद्यार्थी, शिक्षक व शाळा संबंधित कर्मचारी यांनी घरातच थांबावे इतरत्र फिरू नये तसे आढळून आल्यास प्रशासन व पोलीस प्रशासन यांच्याकडून कारवाई केली जाईल त्यामुळे योग्य ती दक्षता घ्यावी.

**तथापि या कालावधीत १० वी व १२ वी च्या परीक्षा पूर्व नियोजनाप्रमाणे सुरु राहतील सदर परिक्षेसाठी नेमण्यात आलेल्या शिक्षक व कर्मचारी यांनी परीक्षा कालावधीत परिक्षा केंद्रावर हजर रहावे.**

(सुनिल कु-हाडे)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे

(डॉ गणपत मोरे)
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
पुणे जिल्हा परिषद पुणे

(अनुराधा ओक)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे

प्रत :- माहितीस्तव सविनय सादर.

१. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे.

२. मा. आयुक्त, (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे.

३. मा. जिल्हाधिकारी, पुणे.

४. मा. आयुक्त, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

५. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद पुणे.

६. मा. पोलीस आयुक्त, पुणे व पिंपरी चिंचवड शहर.

७. मा.शिक्षण संचालक, प्राथमिक,माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य पुणे.

माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१. प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, पुणे व पिंपरी चिंचवड मनपा.